संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : १२४ वा ● ● रविवार दि. २४ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

## कोळ्यात मोटरसायकलला कट मारल्याने दोन गटात राडा

### भांडणात दोघांचा खून : सांगोला पोलिसात गुन्हा दाखल : गावात भीतीचे वातावरण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** कोळे (ता.सांगोला) येथे दोन गटात मोटरसायकलला कट मारण्याच्या कारणावरून चाकू, धारदार शस्त्र, काठीने मारामारी करण्यात आली. या मारहाणीत बाळु आलदर व सुरज रमेश मोरे यांचा खून करण्यात आला, तर दोन्ही गटातील पाच जण गंभीर जखमी झाले.यामुळे कोळा परिसरात मोठी उडाली असून परिसरात दहशतीचे वातावरण असून गावामध्ये पोलिसांचा मोठा बंदोबस्त असून गावात तणावपूर्ण वातावरण आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, गुरुवार २१ मार्च रोजी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मायाक्का मंदिराजवळ मोटरसायकलला मोटर सायकलने कट मारली. मोटरसायकल



बाळु आलदर



सुरज मोरे

मधून फटाक्याचा आवाज काढण्यात आला. या कारणावरून दोन गटात भांडणे झाली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवार २२ मार्च रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अर्जुन चौक कोळा येथे दोन गटात भांडणे झाली. यामध्ये चाकूने पोटात भोसकून काठीने हाताने व लाकडी फळीने दोन गटात जबर मारामारीचा प्रकार घडला. यामध्ये बाळू शामराव आलदर (रा. संत तुकाराम नगर, आलदर वस्ती कोळे ता. सांगोला) व सुरज उर्फ बंड्या रमेश मोरे (वय ३१, रा. आंबेडकर नगर, कोळे ता. सांगोला) यांचा खून झाला. हे दोघेही दोन वेगवेगळ्या गटातील आहेत.

या हाणामारीत कुंडलिक आलदर, दत्ता आलदर, विनय मोरे, रितेश काटे, सुजित काटे हे पाच जण जखमी झाले आहेत. याबाबत, कुंडलिक महादेव आलदर व विकास महादेव मोरे यांनी पोलिसात परस्परविरोधी फिर्याद दिली असून, संशयित आरोपी कुंडलिक महादेव आलदर, दत्तात्रय महादेव आलदर, सागर आलदर, बाळू शामराव आलदर, विजू ज्ञानू खरात, चंद्रकांत तुकाराम आलदर तसेच दुसऱ्या गटातील बंडू सुरज मोरे छोट्या उर्फ विनय मोरे जयराम काटे, शिवराम उर्फ सुजित काटे, विकास मोरे, अभिमान मोरे यांच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा सांगोला पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. या घटनेत दोघांना अटक केली असून, चौघांना संशयावरून ताब्यात घेतले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंगळवेढा, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांनी पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसमवेत घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. या घटनामुळे सर्वसामान्य जनता भयभीत झाली आहे.

## वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात शहीद दिन साजरा



तासगाव : येथील वसंतदादा महाविद्यालयात शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर.

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** तासगावच्या पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात २३ मार्च शहीद दिवस साजरा केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांच्या हस्ते शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री हुजेर म्हणाले, भारताला स्वतंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वत:च्या प्राणाची आहुती देणाऱ्या भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या स्मरणार्थ देशभरात शहीद दिवस साजरा केला जातो. २३ मार्च रोजी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या भारतमातेच्या वीर जवानांना फाशी दिली होती. त्यांच्या या बलिदानामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवी दिशा मिळाली. त्यामुळेच आजचा दिवस शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम कमिटीप्रमुख डॉ.साईनाथ घोगरे यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य जे.ए.यादव यांसह सर्व विभागाचे विभागप्रमुख प्राध्यापक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीसीए.ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्यावी लागणार एस.सी.ई.टी.परिक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ (Academic Years 2024-25) पासून बी.सी.ए., बी.बी.ए, बी.एम.एस., बी.बी.एम. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा  कक्षामार्फत सीईटी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याकरीता गुरुवार दिनांक २१ मार्च २०२४ पासून अर्ज नोंदणीला सुरुवात झालेली आहे.

महा-बी.बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी.बी.एम. सीईटी २०२४ सामाईक प्रवेश परीक्षा प्रथमच महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. नोंदणी अर्ज करण्याची अंतिम मुदत ११ एप्रिल २०२४ पर्यंत देण्यात आली आहे.

चालू शैक्षणिक वर्षांपासून या अभ्यासक्रमांना सीईटी लागू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्षे २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येते.

अधिक माहितीसाठी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला येथे संगणकशास्त्र विभागाला भेट देऊन प्रा.निलेश रसाळ(मो-९८८१४३०३०४) व प्रा.शेख जावेद (मो-७३८७८६७५८५) यांना समक्ष भेटून आपला नोंदणी अर्ज पूर्ण करावा. असे आवाहन संगणकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.कोळवले एच.डी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी यांनी केले आहे.

## दूध पुरवठा चढ्या दराने नव्हे, उलट ३३ कोटींची बचत

### २०२२ च्या निकषानुसार केंद्रीय पद्धतीने ई-निविदा : समाजकल्याण आयुक्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना दुधाचा पुरवठा हा चढ्या दराने नव्हे, तर उलट त्यातून ३३ कोटी रुपयांची बचत होत आहे. शिवाय, या दरात प्रत्येक आश्रमशाळेपर्यंत दूध पोहोचविण्याचा खर्च सुद्धा अंतर्भूत आहे, अशी माहिती आदिवासी विकास विभागाने दिली आहे.

आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना दुधाचा पुरवठा करण्याची संपूर्ण प्रक्रिया ही ३० डिसेंबर २०२० च्या तरतुदीनुसारच सुरु आहे. हे दूध दर ठरविताना डेअरी उत्पादक आणि महानंदा यांच्याकडून दर मागविण्यात आले. त्या दराची सरासरी ही २७.७० रुपये प्रति २०० मि.लि. टेट्रापॅक अशी आली. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे दर अधिक होते, तर ४ कंपन्यांनी न्यूनतम दर दिले. त्यांच्याशी वाटाघाटी करुन हा दर २६.२५ रुपये असा ठरविण्यात आला. यात सर्व प्रकारच्या करांचा समावेश आहे, तसेच यात अतिदुर्गम भागातील ४२७ आश्रमशाळांपर्यंत पोहोचविण्याचा खर्च सुद्धा अंतर्भूत आहे. महानंदाने दिलेल्या दरांशी तुलना केली तर सरकारची ३३ कोटी रुपयांची बचत झाली आहे, असे आदिवासी विकास विभागाने म्हटले आहे.

२०२२ च्या निकषानुसार केंद्रीय पद्धतीने ई-निविदा : समाजकल्याण आयुक्त

ई-निविदा प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी २४ जून २०२२ रोजी केंद्रीय पद्धतीने एकसमान निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आणि तीच पद्धत अनुसरुन सर्वांत कमी दर देणाऱ्या पुरवठादारासोबत शासन स्तरावर वाटाघाटी करुन भोजन पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती सामाजिक न्याय विभागाने दिली आहे. २०१९ चे दर आणि २०२३ चे दर यात अंतर असले तरी विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या आहारात झालेले बदल आणि या वस्तुंच्या दरात झालेले बदल लक्षात घेता, हे दर वाजवी आहेत. ४४३ शासकीय वसतीगृहे आणि ९३ शासकीय निवासी शाळांतील ५८,१६१ विद्यार्थ्यांना २ वेळचे जेवण तसेच इतर सोयीसुविधा देण्यात येतात. भोजनात गहू, बाजरी, ज्वारी, तांदूळ, डाळ, भाजीपाला, कंदभाजी तर नाश्त्यासाठी उसळ, पोहे, उपमा, शिरा यापैकी एक. दूध, अंडी, कॉर्नफ्लेक्स, प्रत्येक दिवशी ऋतुमानाप्रमाणे फळ, मांसाहार करणाऱ्यांना आठवड्यातून दोनदा मांसाहार, शुद्ध तुप इत्यादी आहार देण्यात येतो, असेही सामाजिक न्याय विभागाने म्हटले आहे.

## जेष्ठ नेते आण्णासाहेब पत्की यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्याचे ज्येष्ठ नेते, करगणी गावचे सुपुत्र अण्णासाहेब पत्की यांचे काल दिनांक २३ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. अण्णासाहेब पत्की यांनी करगणी ग्रामपंचायतचे सलग २८ वर्ष सरपंच म्हणून आपली कारकीर्द गाजवली. त्याच बरोबर त्यांनी आटपाडी बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये विजय होत त्यांनी सभापती पदही  भूषविले. करगणी जिल्हा परिषद गटातून जिल्हा



आण्णासाहेब पत्की

परिषदेवर विजय मिळवला होता. जिल्हा परिषदेच्या जनरल सभेमध्ये त्यांनी विविध विषयावर चर्चा करत अनेक प्रश्न मार्गी लावले. करगणी परिसरामध्ये त्यांचा राजकारणात मोठा दबदबा होता.  त्यांच्या निधनाने राजकारणातील जुने जाणते नेतृत्व पडद्याआड गेल्याने अनेक मान्यवराकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

## जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** लोकसभा निवडणूक, विविध आंदोलने, आगामी सण, उत्सव, यात्रा, जत्रा, उरूस आदिच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सन १९५१ च्या महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सांगली जिल्हा स्थलसीमा हद्दीत प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार दि. २४ मार्च २०२४ ते ०७ एप्रिल २०२४ अखेर पर्यंत पुढील कृत्ये करण्यास मनाई केली आहे. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे काठ्या अथवा लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेण्यास, कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बरोबर नेण्यास मनाई केली आहे. तसेच दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे आणि तयार करणे, व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे, ज्याच्या योगाने शांतता व सुव्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण होईल किंवा सभ्यतेला बाधा येईल अशा पध्दतीने हावभाव करणे, फलक चित्रे किंवा चिन्हे तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे आणि प्रसारीत करणे, जिल्ह्यात परवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई केली आहे. हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचारी, धार्मिक विधी, अंत्यविधी व परीक्षा यांना लागू राहणार नाही.

हा आदेश दि. २४ मार्च २०२४ रोजीचे ०६.०० वाजल्यापासून ते दि. ०७ एप्रिल २०२४ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

## नवमतदारांचा नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

### एस. चोक्कलिंगम् : राज्यात सहा दिवसात १.८४ लाख नवीन मतदारांची नोंदणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहिर केला आहे. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघासाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे. दिनांक १७ ते  २२ मार्च २०२४ या कालावधीत राज्यात १ लाख ८४ हजार ८४१ इतक्या नवीन मतदारांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम् यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ येथे लोकसभा निवडणूक २०२४ बाबत माहिती देण्यासंदर्भात आयोजि पत्रकार परिषदेत  श्री एस. चोक्कलिंगम् बोलत होते. यावेळी सह सचिव व अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक(माहिती) डॉ.राहूल तिडके,  अवर सचिव  तथा उप निवडणूक अधिकारी शरद दळवी उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात विदर्भातील ५ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक १९.०४.२०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठीचे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २०.०३.२०२४ पासून सुरु झाली आहे, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक २७.०३.२०२४ असा आहे, नामनिर्देशनपत्राची छाननी दि.२८.०३.२०२४ रोजी आहे, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दि.३०.०३.२०२४ असा आहे. त्या दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी निश्चित होईल.

## फॅबटेक पब्लिक स्कूलचे घवघवीत यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** फॅब्रटेक एज्युकेशन सोसायटी पुणे संचलित फॅब्रटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल ऑलिंपियाड परीक्षेत यश संपादन केले आहे इंटरनॅशनल सिल्व्हर झोन ऑलिंपियाड परीक्षेसाठी एकूण ३४० विद्यार्थी बसले होते. सिल्वर झोन ऑलिंपियाड परीक्षेसाठी इयत्ता पहिली ते चौथी गटांसाठी २२६ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील १८ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, १७ विद्यार्थ्यांना सिल्व्हर मेडल व १५ विद्यार्थ्यांना ब्राँझ मेडल व १७६ विद्यार्थ्यांना विशेष सहभागी सर्टिफिकेट मिळाले.

पहिली ते चौथी गटांमधील सिल्व्हर झोन इंग्लिश ऑलिंपियाड परीक्षेसाठी ८९ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील २५ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, १० विद्यार्थ्यांना सिल्व्हर मेडल व ९ विद्यार्थ्यांना ब्राँझ मेडल मिळाले. विशेष सहभागी सर्टिफिकेट मिळाले. सिल्वर




सांगोला : इंटरनॅशनल ऑलिंपियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनाचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर

झोनल परीक्षा अंतर्गत विशेष १७ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले. मॅथ्स ओलंपियाड परीक्षेसाठी ५ गोल्ड मेडल,५ सिल्वर मेडल ५  ब्राँझ मेडल मिळाले.

सायन्स ओलंपियाड परीक्षेमध्ये २ गोल्ड मेडल, २ सिल्वर मेडल, २ ब्राँझ मेडल मिळाले.  पाचवी ते आठवी गटांसाठी ऑलिंपियाड परीक्षेसाठी १९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधील १५ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल तर ७ विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल व ७ विद्यार्थ्यांना ब्राँझ मेडल मिळाले. व २९ विद्यार्थ्यांना विशेष सहभागी सर्टिफिकेट मिळाले.इंग्लिश ऑलिंपियाड परीक्षेसाठी २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील ६ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ,६ विद्यार्थ्यांना सिल्व्हर मेडल व ६ विद्यार्थ्यांना ब्राँझ मेडल मिळाले. विशेष सहभागी सर्टिफिकेट मिळाले.  मॅथ्स ओलंपियाड परीक्षेसाठी एकूण ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यातील ६ गोल्ड मेडल,६ सिल्वर मेडल ,६ ब्राँझ मेडल मिळाले. सायन्स ओलंपियाड परीक्षेमध्ये ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये ४ गोल्ड मेडल, ६ सिल्वर मेडल, ६ ब्राँझ मेडल मिळाले.

गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, स्कूलचे प्राचार्य सिकंदर पाटील, ए.ओ.वर्षा कोळेकर, सुपरवायझर वनिता बाबर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख सानवी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या गणित विषयाच्या शिक्षिका कोमल पवार, मेघा स्वामी, अश्विनी मोरे व मृणाल राऊत यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.

स्कूलच्या शिक्षकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## फडणवीस यांचे पीए असल्याचे सांगत १५ लाखांची फसवणूक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक असल्याची बतावणी करून सातरस्ता येथील ४५ वर्षीय व्यक्तीकडून १५ लाख रुपये घेतल्याच्या आरोपाखाली मरिन ड्राईव्ह पोलिसांनी शनिवारी दोघांना अटक केली.

आरोपींनी तक्रारदाराच्या सोसायटीचे काम करण्याच्या नावाखाली ही रक्कम घेतली होती. याप्रकरणी तक्रारीनंतर तोतयागिरी व फसवणूक केल्याप्रकरणी मरिन ड्राईव्ह पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला होता. सुहास महाडिक (५०) व किरण पाटील (५०) अशी अटक आरोपींची नावे आहेत. महाडिक सातरस्ता परिसरातील रहिवासी आहे, तर पाटील हा टिटवाळा परिसरातील रहिवासी आहे. आरोपी सुहास महाडिक याच्याविरोधात यापूर्वी मुंबईतील आग्रीपाडा पोलीस ठाण्यात मारहाण व धमकावल्याप्रकरणी एक गुन्हा दाखल होता. तक्रारदार महेश कस्तुरी (४६) असे तक्रारदाराचे नाव आहे. ते व्यवसायाने धोबी असून सातरस्ता येथील साईबाबा नगर येथील इमारतीत राहतात. धोबी घाट सोसायटीचे अध्यक्ष व निवडणुकीबाबत याचिका दाखल आहे.

आरोपींनी कस्तुरी यांना किरण पाटील यांनी फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक असल्याचे सांगून सोसायटीच्या निवडणूक व अध्यक्षाबाबतचे रजिस्टार कार्यालयातील काम करण्यासाठी १५ लाख रुपये घेतले. त्यासाठी आरोपींनी नरिमन पॉईंट येथील एअर इंडिया इमारतीशेजारी असलेल्या खाद्यपदार्थांच्या दुकानाजवळ बोलावले होते. पण आरोपी यांनी फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक असल्याचा बनाव केल्याचे लक्षात आल्यानंतर कस्तुरी यांनी मरिन ड्राईव्ह पोलिसांकडे याप्रकरणी तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी फसवणूक व तोतयागिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोघांनाही शनिवारी अटक केली. गुन्ह्यांतील १५ लाख रुपये अद्याप हस्तगत करण्यात आलेले नसून त्याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# संपादकीय

## ईडीच्या पिंजऱ्यात केजरीवाल

आप चे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने केलेल्या कारवाईनंतर तिहार जेलमध्ये जाण्याची पाळी आली आहे. लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर केजरीवाल यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली, म्हणून अपच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी आंदोलने केली. भाजपाने विरोधकांना संपविण्याचे कारस्थान रचले आहे, असा टाहो काँग्रेसपासून सर्व भाजपाविरोधी पक्ष फोडत आहेत. पण केजरीवाल हे ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही चौकशीला सामोरे गेले नाहीत, हे कोणी सांगत नाहीत. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत केजरीवाल यांना मोदी सरकारने जेलमध्ये पाठवले म्हणून त्यांना व त्यांच्या पक्षाला थोडी फार सहानुभूती मिळू शकेल, पण कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका कशी होऊ शकेल? दिल्ली सरकारने बनविलेल्या नवीन मद्य धोरणातून त्यांना व त्यांच्या पक्षाला जवळपास साडेतीनशे कोटी रुपये लाच म्हणून पैसे मिळाले, हा आरोप त्यांना न्यायालयात खोडून काढावा लागेल.

केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीला महाराष्ट्रातले नेतेही सामोरे गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरद पवार यांचा ईडीने नुसता नामोल्लेख करताच ते मुंबईतील ईडीच्या कार्यालयात त्यांच्यावर समन्स नसतानाही निघाले होते. महाआघाडी सरकारमध्ये गृहमंत्रीपदावर असलेले अनिल देशमुख यांनाही चौकशीच्या काळात कारावास भोगावा लागला होता. मंत्री छगन भुजबळ यांनाही जवळपास दोन वर्षे आर्थर रोड जेलमध्ये काढावी लागली होती. केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही ते चौकशीला गेले नाहीत. ईडीच्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. आपल्या अटकेच्या कारवाईवर स्थगिती द्यावी, अशी न्यायालयाकडे मागणी केली होती, आपण ईडीकडे चौकशीला जाण्यास तयार आहोत. पण त्यांनी आपल्याला अटक होणार नाही, असे आश्वासन द्यावे अशी केजरीवाल यांनी कोर्टाकडे मागणी केली होती. केजरीवाल हे निर्दोष आहेत की ईडीच्या म्हणण्याप्रमाणे मद्य घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार आहेत, हे न्यायालय ठरवेल.

केजरीवाल हे दिल्लीमध्ये आम जनतेत लोकप्रिय आहेत. उच्च न्यायालयाने दुपारी अडीच वाजता त्यांचा अर्ज फेटाळून लावल्यावर ईडीची फौज त्यांच्या घरी सायंकाळी ७ वाजता हजर झाली. दोन तास चौकशी केल्यावर त्यांना अटक झाली. रात्री साडेअकरा वाजता त्यांना ईडीच्या मुख्यालयात आणण्यात आले. त्यानंतर रात्री १२ वाजता त्यांची वैद्यकीय तपासणी झाली व दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ मार्च रोजी त्यांना ईडीने न्यायालयासमोर उभे केले. मद्य धोरण घोटाळ्यात जे काही देव-घेवीचे व्यवहार झाले त्याची चौकशी होणे महत्त्वाचे आहे, असे नमूद करीत न्यायालयाने केजरीवाल यांना २८ मार्चपर्यंत ईडीची कोठडी सुनावली. अटक झालेल्या केजरीवाल यांना राजकीय लाभ होईल, त्यांना जनतेची सहानुभूतीही मिळेल पण भाजपाला त्याची किंमत चुकवावी लागेल, असा इशारा शरद पवार यांनी दिला आहे. या अगोदर काँग्रेस पक्षाचे बँक खाते गोठविण्यात आले, आता मुख्यमंत्रीपदावर असलेल्या केजरीवाल यांना अटक झाली, विरोधी पक्षांचा आवाज दाबण्यासाठी ईडी व इन्कम टॅक्सचा वापर केला जातो आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. नोकरशहा व मुख्यमंत्री राहिलेल्या केजरीवाल यांनी टाटा स्टीलमध्ये तीन वर्षे नोकरी केली आहे. सन २०१२ मध्ये त्यांनी पक्ष स्थापन केला. २०१३ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी हेमंत सोरेन यांनी झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाचा राज्यपालांकडे राजीनामा दिला व लगेचच ईडीने त्यांना अटक करून जेलमध्ये रवानगी केली.

नवीन मद्य धोरणातून केजरीवाल यांनी व त्यांच्या पक्षाने हवालामार्फत ४५ कोटी रुपये चार मार्गांनी गोव्यात पाठवले, असे ईडीने न्यायालयापुढे सांगितले. गोव्यातील आपच्या उमेदवारांनीही त्याला दुजोरा दिलेला आहे. नवीन मद्य धोरणामुळे दिल्ली सरकारला २८०० कोटींचा तोटा झाला, दिल्ली सरकारने मद्य उद्योजक व ठेकेदारांना लाभ देण्यासाठी १३६ कोटींची लायसन्स फी माफ केली, त्याबदल्यात निधी मिळवला, असे आरोप ईडीने केले आहेत. मद्य धोरणाच्या व्यवहारात मनीष सिसोदिया, संजय सिंह यांचाही सहभाग होताच. तसेच विजय नायर हा मध्यस्थ होता व तो केजरीवाल यांचा उजवा हात म्हणून ओळखला जात होता. विजय नायर हा माजी मुख्यमंत्री सी. चंद्रशेखर राव यांची कन्या कविता यांच्यासाठीही काम करीत असे. कविता याही जेलमध्ये आहेत. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी ईडीच्या वतीने २८ पानांचा युक्तिवाद न्यायालयात सादर केला व त्यात त्यांनी दिल्ली सरकारच्या मद्य धोरण घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असा केजरीवाल यांचा उल्लेख केला आहे. त्यामुळे सध्या ईडी ही आपच्या व केजरीवाल यांच्या मागे लागली आहे.

# प्रत्येक मतदाराने मतदान केल्याशिवाय लोकशाहीला पूर्णत्त्व नाही : एस. चोक्कलिंगम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


एस. चोक्कलिंगम

**मुंबई :** सशक्त लोकशाहीमध्ये मतदानाचे पावित्र्य ठेवून प्रत्येक मतदाराने मतदान करणे अत्यावश्यक आहे. याच्याशिवाय लोकशाहीला पूर्णत्त्व नाही. नागपूर लोकसभेसाठी मागच्या वेळेस अवघे ५४ टक्के मतदान झाले होते हे विसरता कामा नये. याचाच अर्थ ४६ टक्के मतदारांनी आपल्या मतदानाच्या राष्ट्रीय कर्तव्याचे पालन केले नाही. यावेळेस हे चित्र बदलविण्यासाठी सर्व मतदार राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेतून मतदानाचे प्रमाण ७५ टक्यांपर्यंत नेतील, असा विश्वास राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी व्यक्त केला. नागपूर व रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या पूर्वतयारीचा आज त्यांनी आढावा घेतला. बचतभवन येथे आयोजित केलेल्या या आढावा बैठकीस पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, जिल्हाधिकारी तथा नागपूर लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, रामटेक लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी तुषार ठोंबरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रविण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागपूर पाठोपाठ रामटेक मध्ये ६४ टक्के मतदान मागच्या वेळेस झाले होते. मतदानाचे प्रमाण हे वाढले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाने मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे अशी अपेक्षा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी व्यक्त केली. मतदानाचे प्रमाण ७५ टक्यांवर न्यायचे असेल तर मतदानाचा निर्धार हा शंभर टक्क्यांचा हवा. आदर्श गावांमध्ये शंभर टक्के मतदान होणे शक्य असून त्या दिशेने सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी तथा नागपूर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी मतदान जनजागृतीसाठी स्वीप अंतर्गत सुरु केलेल्या विविध उपक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# सगळ्यांचा करेक्ट कार्यक्रम करू : आम.रोहित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**बारामती :** बारामती लोकसभेत येत असलेल्या इंदापूर विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या मेळाव्याला कार्यकर्त्यांनी उपस्थित राहू नये, अशा धमक्या काही जणांकडून देण्यात आल्या होत्या. याबाबत राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांना विचारले असता ते म्हणाले, आमच्या कार्यकर्त्यांना धमक्या देण्यात आल्या. अनेक गावांमध्ये जेवण ठेवण्यात आलं. तरीही इथल्या स्वाभिमानी जनतेने त्या धमक्यांना भीक न घालता सभेला हजेरी लावली. इंदापूर, बारामतीमधील जनता केंद्रातील नेते असू द्या किंवा भाजपाची लोक असू द्या त्यांना घाबरत नाही. कदाचित नेता एकवेळेस घाबरेल पण जनता कुणालाही घाबरत नाही.

दिल्लीचे अरविंद केजरीवाल यांना अटक केल्यानंतर आता उद्धव ठाकरे यांचा नंबर लागणार असे ट्विट अतुल भातखळकर यांनी केले आहे. यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की, त्यांना कुणाचा फोन आला असावा किंवा त्यांना कुणी सांगितलं असावं, याची मला माहिती नाही. मात्र ज्या लोकांना भाजपा घाबरते, त्यांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याआधी शरद पवारांनाही ईडीने नोटीस दिली होती, त्यानंतर काय झालं, हे पूर्ण महाराष्ट्राने पाहिलं. संजय राऊत यांनाही काही दिवस अटकेत ठेवले होते. पण आताही ते भाजपाविरोधात लढत आहेत. भातखळकरांच्या ट्विटवरून कारवाई झाली, तरी लोक भाजपाला पाठिंबा देणार नाहीत. रोहित पवार पुढे म्हणाले की, भाजपा कुणावर कारवाई करेल, याबाबत काहीही सांगता येत नाही. कर्नाटक मधील दोन शेतकरी ज्यांना घर नाही, अशा शेतकऱ्यांवरही कारवाई झाली आहे. पण पवार कुटुंबामध्ये विचारांना किंमत आहे. त्यामुळेच मी आणि युगेंद्रने आजोबांची साथ देण्याचा निर्णय घेतला. इंदापूर येथील शेतकरी मेळाव्यात अजित पवार गटाचे आमदार दत्तात्रय भरणे यांच्यावर टीका करण्यात आली. मात्र हर्षवर्धन पाटील यांच्याबाबत कोणतेही भाष्य करण्यात आले नाही, यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की, एकाच भाषणात सर्व बोललं तर पुढच्या भाषणात बोलायला काही उरणार नाही. पुढच्या भाषणासाठी काही गोष्टी राखून ठेवल्या आहेत. टप्प्याटप्प्याने सगळ्यांचा करेक्ट कार्यक्रम करू, अशी सूचक प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली.

# मतदान केंद्रावर मतदान घेण्यासंबंधी दिलेले आदेश व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे



**सोलापूर :** जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसिलदार, क्षेत्रीय अधिकारी यांनी मतदान केंद्रावरती मतदान घेण्यासंबंधी दिलेले आदेश व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवन येथे सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसिलदार, क्षेत्रीय अधिकारी यांच्याकरिता निवडणूक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंग, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्यासह सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि तहसिलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, मतदानाचे संपूर्ण कामकाज इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे होणार आहे. या निवडणूकमध्ये एम-३, कंट्रोल युनिट, बॅलट युनिट व व्हीव्हीपॅट मशीनचा वापर आहे. यासाठी विहित नियम व मतदान केंद्रातील मतदान प्रक्रियेसंबधी प्रत्येक टप्पा काळजीपूर्वक वाचा तसेच भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करा.

उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक प्रशिक्षणाचे नोडल अधिकारी संतोष देशमुख यांनी पीपीटीद्वारे मतदान केंद्राची तयारी, मॉक पोल घेणे, प्रत्यक्ष मतदानासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट तयार करणे, सर्व मशीन्स सीलबंद करणे, मतदान प्रक्रियेसंबधी विविध प्रपत्रे भरणे, मतदान यंत्रे, मतदान साहित्य व सीलबंद पाकिटे जमा करणे याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच मतदान पथकाची जबाबदारी, मतदान प्रक्रियेतील महत्वाचे टप्पे, मतदानापूर्वी मतदान दरम्यान आणि मतदान संपल्यावर येणाऱ्या विविध व वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली.

मतदान केंद्राध्यक्षासाठी काय करावे आणि काय करू नये, हँडबुक २०२३, चेकलिस्ट २०२३, आणि ईव्हीएम व व्हीव्हीपॅट २०२३ मध्ये देण्यात आलेल्या माहितीपुस्तीकेचे वाचन करावे. दिव्यांग मतदारासाठी मतदान केंद्रावर तयार करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी करावी. मतदान केंद्रावर व त्याच्या सभोवताली निवडणूक कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी असेही श्री. देशमुख यांनी सांगितले.

टपाली मतदानापासून मतदार वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत सोलापूर व माढा मतदारसंघातील एकही मतदार टपाली मतदानापासून वंचित राहणार नाही याबाबत सर्व निवडणूक अधिकारी व कर्मचारी यांनी काळजी घेऊन या प्रशिक्षणात अत्यंत सूक्ष्मपणे टपाली मतदान प्रक्रिया समजून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

टपाली मतदान पत्रिका प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सर्व टपाली मतदान प्रक्रियेत नेमणूक करण्यात आलेले अधिकारी कर्मचारी उपस्थित होते, त्यांना प्रशिक्षण देताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी माढा लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह, सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी ,अतिरिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ,टपाली मतदान प्रक्रिया नोडल अधिकारी व सदरील सर्व प्रक्रियेत नियुक्त अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते . टपाली मतदान प्रक्रिया कशी राबविण्यात यावी याबाबत नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर व फलटणचे प्रांताधिकारी सचिन ढोले यांनी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सदरील टपाली मतदान प्रक्रिया ही जे शासकीय कर्मचारी आहेत व इतरत्र कार्यरत आहेत , जे ८५ वर्षा पेक्षा जास्त वयाचे ज्येष्ठ नागरिक आहेत, कोविड बाधित असणारे नागरिक , दिव्यांग व्यक्ती व मतदाना दिवशी अत्यवश्यक सेवेत असणार आहे , त्यांच्या करिता राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले . तसेच सदरील सेवा पाहिजे असल्यास पात्र मतदारांनी १२ D अर्ज भरून निवडणुकीची अधिसूचना जाहीर केल्यानंतर ५ दिवसाच्या आत निवडणूक निर्णय अधिकाऱ्या पर्यंत पोचविण्यात यावे हे आवश्यक आहे .सदरील अर्ज हे इडज व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येणार आहे. मतदानाच्या ३ दिवस अगोदर सदरील सेवे करिता केंद्र टपाली मतदान प्रक्रिया करिता कार्यान्वित असणार आहेत. त्यामुळे सर्व पात्र मतदान करणाऱ्या मतदारांनी या सेवेचा लाभ घेतला पाहिजे यासाठी कार्यरत कर्मचारी यांनी प्रयत्न करण्याबाबत सूचनाही करण्यात आल्या.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
Email - netra7676@gmail.com
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



# छत्रपतींच्या वंशजांना ताटकळत ठेवणे हा अपमानच : अनिल गोटे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीच्या दिल्लीतील नेत्यांनी छत्रपतींच्या वंशजांनाच तिकीटासाठी ताटकळत ठेवून महाराजांचा आणि महाराष्ट्रातील मराठा समाजाचा एक प्रकारे अपमानच केला आहे, अशी टीका आज माजी आमदार अनिल गोटे यांनी केली आहे. सातारा लोकसभेच्या उमेदवारी संदर्भात छत्रपतींचे वंशज उदयनराजे भोसले हे सध्या दिल्ली येथे गेले आहेत. त्यांना गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीतील भाजप नेत्यांची भेट झालेली नाही. या पार्श्वभूमीवर लोकसंग्रामचे नेते तथा माजी आमदार अनिल गोटे यांनी भारतीय जनता पार्टी आणि महाराष्ट्रातील महायुतीतील नेत्यांवर टीका केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तब्बल ३५० वर्षापुर्वी तत्कालीन व्यापारी शहर



अनिल गोटे उदयनराजे भोसले

असलेल्या सुरतेतील वखारी लुटल्या होत्या. महाराजांच्या जीवनातील सुरतेची लूट व आग्राहुन सुटका, अफझलखानाचा वध इत्यादी प्रसंग जगाच्या इतिहासात नोंदले गेले आहेत. त्याच गुजराथचे नेते महाराष्ट्रातील गुजरात धार्जीन्या मराठी नेत्यांना लाचार करून छत्रपती शिवरायांचा सूड उगवत आहेत असा गंभीर आरोप गोटे यांनी केला.

महाराष्ट्रातील गुजराथ धार्जीन्या उच्चवर्णीय नेत्यांना हाताशी धरून आता त्यांनी प्रत्यक्ष छत्रपतींच्या वंशजांचाच अपमान करण्यापर्यंत मजल गेली आहे. शिवरायांचे वंशज साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांना तीन दिवसांपासून भेटीसाठी वेळ न देता तिकीटासाठी लटकत ठेवले आहे. यापुर्वी साताऱ्यांची जन्मभुमी असलेले मराठा नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व बारामतीचे अजित पवार यांची अवस्था तर घंटी वाजवल्या नंतर धावत येणाऱ्या शिपायासारखी करून टाकली आहे. अशी टीका गोटे यांनी केली आहे. दिल्ली वाऱ्याकरून सुध्दा दिल्लीतल्या शहा व बादशहाने नुसती आश्वासनाची खैरात करून बोळवण केली आहे. दिल्ली वारी करण्याकरीता विमानात बसण्यापुर्वी महाराष्ट्रातील जनतेला 'आता यादी मान्य होईल' असे सांगून बसतात. दिल्लीला जावून नेत्यांच्या वेटींग लिस्ट मध्ये नाव नोंदवून तासंतास ताटकळत बसतात. बाहेर आल्यावर कसलेल्या कलाकारांप्रमाणे चेहऱ्यावर हास्य आणून सांगतात की, 'दोन दिवसांनी पुन्हा आम्ही बसणार आहोत'. महाराष्ट्राची कधी नव्हे, एवढी अब्रू देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केली आहे. दिल्लीश्वरांच्या दरबारात सरदारांच्या रांगेमध्ये उभे केले, यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रत्यक्ष औरंगजेबाला ललकारले होते. त्या शिवरायांचा महाराष्ट्र आज दिल्लीश्वरांच्या चरणी लोटांगण घालीत आहेत. यापेक्षा महाराष्ट्राचे दुर्दैव काय आहे?, असा सवाल लोकसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार, अनिल गोटे यांनी केला आहे.

# ८५ वर्षावरील वरिष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांना गृह मतदानाची सुविधा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ८५ वर्षावरील वरिष्ठ नागरीक तसेच ४० टक्केपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले मतदार यांना त्यांची इच्छा असल्यास गृह मतदान सुविधा राज्यातील सार्वत्रिक लोकसभा निवडणूकांमध्ये प्रथमच उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तथापी त्यांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्याची सुविधासुद्धा उपलब्ध आहे. मात्र गृह मतदानाच्या सुविधेसाठी अर्ज केल्यास त्यांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिली.

# ३७ लाखांचा युरिया जप्त

## कृषी विभागाची कडेगाव मध्ये कारवाई : पोलिसात गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेगाव :** कडेगाव कडेगाव औद्योगिक वसाहत येथे कृषी विभागाने छापा टाकून ३७ लाख ८९ हजार ७७९ रुपयांचा सुमारे २१० टन युरियाचा साठा जप्त केला. याप्रकरणी गोदाम मॅनेजर शंकर जगन्नाथ काळे (वय ५३, रा. आटके, ता. कराड, जि. सातारा) याच्याविरोधात कडेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. कडेगाव पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल बिरनाळे यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.

कडेगाव एमआयडीसीतील प्लॉट नं. ए ३८ मधील गोदामावर छापा टाकून तपासणी केली असता या गोदामात कृषी वापराच्या युरियाच्या ४५ किलोच्या २७२९ बग्ज आढळून आल्या. तर गोदामासमोरील उभ्या असलेल्या ट्रक मध्ये ५० किलोच्या ४०० बग्ज आढळून आल्या. गोदाम चालक शंकर काळे याने रासायनिक खताचे मूळ आवरण फोडून तो कारखान्याच्या वापरासाठी देण्याच्या येणाऱ्या आवरणात भरून शिलाई करून ट्रक मध्ये भरल्याचे आढळून आले. कृषी व औद्योगिक वापराचा युरिया एकूण ४४७९ बग्ज व त्याची एकूण किंमत ३७ लाख ८९ हजार ७७९ रुपये आहेत.

# कोल्हापुरात शाहू महाराजांना 'वंचित' चा पाठिंबा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापुर :** लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदार संघात शाहू छत्रपती यांना वंचितचा पाठिंबा असेल अशी मोठी घोषणा काल (दि.२३) पत्रकार परिषदेत वंचितचे डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी केली. पुढे बोलताना ते असेही म्हणाले की, आमचं टार्गेट भाजप आहे. महाविकास आघाडीत पाच जागांवरील तिढा



शाहू छत्रपती प्रकाश आंबेडकर

**शाहू महाराज यांनी मानले आभार**

वंचित बहुजन आघाडीने कोल्हापूर मतदारसंघात छत्रपती शाहू महाराज यांना दिलेल्या पाठिंब्याचे शाहू महाराज यांनी द वर पोस्ट करत आभार मानले आहेत. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऋणानुबंध जपले गेल्याची भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

अद्याप आहे. त्यांच्यामध्येच अजून जागा वाटपाचे ठरत नाही तर, आम्ही आघाडीत येवून काय करणार? असा सवाल करत आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत. आता २६ मार्च पर्यंत आम्ही आमची भूमिका मांडू. तोपर्यंत आघाडीने निर्णय घ्यावा. असे आवाहन डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी केले. पुढे बोलताना ते म्हणाले काँग्रेसला आम्ही सात जागांवर पाठिंबा देणार. काँग्रेसने त्यांच्या सात जागा आम्हाला कळवाव्या.

पुढे बोलताना डॉ. प्रकाश आंबेडकर म्हणाले, प्रकाश शेंडगे यांच्याकडुनही युतीचा प्रस्ताव आला आहे. आता आम्ही २६ मार्च पर्यंत महाविकास आघाडीच्या निर्णयाची वाट पाहू. त्यांच्यामध्ये कोणता तिढा आहे, हे आम्हाला माहित नाही. त्यांच्यातील वाद मिटलेले नाहीत. काँग्रेसला कोणत्या सात जागांवर पाठींबा हवा आहे, हे आम्हाला त्यांनी कळवावे, आम्ही त्यांना पाठींबा देवू. असेही यावेळी त्यांनी स्पष्ट करत म्हणाले, आमचं टार्गेट भाजप आहे.

**महाविकास आघाडीतही आपण सहभागी व्हावे : सतेज पाटील**

दरम्यान काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी आपल्या 'सोशल मिडीयावर पोस्ट करत म्हटलं आहे, आदरणीय श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिल्याबद्दल डॉ. प्रकाश आंबेडकरजी आपले धन्यवाद. समतेचा विचार आणि संविधान टिकवण्यासाठी आपला पाठिंबा आम्हांला निश्चितच बळ देईल. तसेच राज्यात महाविकास आघाडीतही आपण सहभागी व्हावे, ही अपेक्षा.

# काँग्रेसची महाराष्ट्रातील दुसरी यादी जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने महाराष्ट्रातील दुसरी यादी जाहीर केली आहे. तर देशपातळीवर ही काँग्रेसची चौथी यादी असून यात एकूण ४५ उमेदवारांचा समावेश आहे.

या यादीत महाराष्ट्रातील चार उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये रामटेकमधून रश्मी बर्वे, भंडारा-गोंदीयातून प्रशांत पडोळे, नागपूरमधून विकास ठाकरे आणि गडचिरोली नामदेव किरसान यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

काँग्रेसने याआधी राज्यातील ७ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर आज काँग्रेसने राज्यातील ४ उमेदवारांची यादी जाहीर केली होती.

रामटेकमधून रश्मी बर्वे, भंडारा-गोंदीयातून प्रशांत पडोळे, नागपूरमधून विकास ठाकरे आणि गडचिरोली नामदेव किरसान यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

**काँग्रेसची पहिली यादी**

कोल्हापूर - शाहू महाराज छत्रपती
सोलापूर - प्रणिती शिंदे
पुणे - रवींद्र धंगेकर
अमरावती - बळवंत वानखेडे
लातूर - शिवाजीराव कलगे
नांदेड - वसंतराव चव्हाण
नंदूरबार - गोवाल पाडवी

**काँग्रेसच्या दुसरी यादी**

रामटेक-रश्मी बर्वे
भंडारा-गोंदीया -प्रशांत पडोळे
नागपूर-विकास ठाकरे
गडचिरोली - नामदेव किरसान

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानासाठी 'इपिक'सह बारा ओळखपत्र ग्राह्य

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक आयोगाने मतदान करण्यापूर्वी मतदारांची ओळख पटविण्याकरिता मतदान ओळखपत्रासह (एझखउ) १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरलेले आहे.

नागपूर आणि रामटेक लोकसभा क्षेत्रात १९ एप्रिलला मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी स्वतःची ओळख पटविण्याकरिता निवडणूक आयोगाने बारा प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहे. त्यामुळे आता लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करताना मतदारांची ओळख पटविणे शक्य होणार आहेत. या ओळखपत्रात आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक व पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या फोटोसह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, कामगार मंत्रालयाने जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र व राज्य सरकार / पीएसयू / पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेली छायाचित्र असलेली सेवा ओळखपत्रे, खासदार, आमदार यांना जारी केलेल्या अधिकृत ओळखपत्रांचा समावेश आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदान करताना कोणतीही अडचण येणार नाही. ते आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.

# सांगली विमानतळाच्या जागेची विक्री ठाकरे सरकारच्या काळात : उदय सामंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना तत्कालीन उद्योग मंत्र्यांनी सांगलीतील विमानतळाची जागा गुजरातच्या व्यापार्याला विकल्याचा गौप्यस्फोट उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी सांगलीत केला. सांगलीमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्यामध्ये बोलत होते, नुकत्याच ठाकरे शिवसेना पक्षाच्या जनसंवाद मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगलीत येऊन विमानतळ का होऊ शकले नाही,असा प्रश्न उपस्थित केला होता. यावरून उद्योग मंत्री सामंतांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधताना अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंना विमानतळ का करता आले नाही, असा प्रश्न केला.



उदय सामंत

सांगलीतील विमानतळाची ६६ एकर जागा तत्कालिन उद्योगमंत्र्यांनी गुजरातच्या उद्योजकाला विकली होती. पण आपण उद्योग मंत्री झाल्यावर तो व्यवहार रद्द केल्याचे सामंत यांनी सांगितले. तसेच सांगलीत आलेल्या उद्धव ठाकरे यांनी वसंतदादा पाटील यांच्या स्मारकाला जाणे पसंत केले. मात्र सांगलीतल्या बाळासाहेब ठाकरेंच्या स्मारकाला भेट देऊ शकले नाहीत, त्यामुळे ते किती काँग्रेसमय झाले आहेत, यावरून स्पष्ट होतं,अशी टीका देखील त्यांनी केली.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६



# पंजाबचा किंग ; दिल्लीवर चार गडी राखत विजय

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चंडीगड :** इंडियन प्रीमियर लीगचा दुसरा सामना काल (दि.२३ मार्च) दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना चंदीगड येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झाला. होम ग्राउंडवर पंजाब संघाने चार गडी राखत विजय मिळवला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ९ गडी गमावून १७४ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाबने १९.२ षटकांत सहा गडी गमावून लक्ष्य गाठले. आयपीएलच्या १७ व्या मोसमाची पंजाबने विजयाने सुरुवात केली आहे. पंजाबने नाणेफेक जिंकली. प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सने २० षटकांत ९ गडी गमावून १७४ धावा केल्या. अभिषेक पोरेलने हर्षल पटेलच्या २० व्या षटकात २५ धावाचोपल्या. त्याने १० चेंडूत चार चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३२ धावा केल्या. पोरेलने २० व्या षटकात तीन चौकार आणि दोन षटकार मारले. शेवटच्या चेंडूवर कुलदीप दोन धावा काढून धावबाद झाला. १९ व्या षटकापर्यंत दिल्लीची



चंडीगड : पंजाब किंगला विजय मिळवून देणारी लियाम लिव्हिंगस्टोन आणि सॅम करन यांची जोडी

धावसंख्या आठ गड्यांच्या मोबदल्यात १४९ धावा होती आणि पोरेलच्या स्फोटक फलंदाजीच्या जोरावर संघाने १७४ धावांपर्यंत मजल मारली होती. १७४ धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्जला चौथ्या षटकात ३४ धावांवर पहिला धक्का बसला. डावाच्या चौथ्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर इशांत शर्माने शिखर धवनला क्लीन बोल्ड केले. धवनने १६ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २२ धावांची खेळी केली. यानंतर, पाचव्या चेंडूवर, प्रभासिमरनने सरळ शॉट खेळला जो इशांतच्या बोटाला लागला आणि नॉन-स्ट्रायकरच्या शेवटी विकेटवर आदळला. त्यानंतर बेअरस्टो क्रीझबाहेर असताना तो धावबाद झाला. बेअरस्टो तीन चेंडूत नऊ धावा करून बाद झाला. पॉवरप्ले (डावाची पहिली सहा षटके) मध्ये संपली. पंजाबने दोन गडी गमावून ६० धावा केल्या.
पंजाब किंग्जला १० व्या षटकात ८४ धावांवर तिसरा धक्का बसला. कुलदीप यादवने प्रभसिमरन सिंगला वॉर्नरकरवी झेलबाद केले. त्याला १७ चेंडूंत पाच चौकारांच्या मदतीने २६ धावा करता आल्या. पंजाबला १२ व्या षटकात १०० धावांवर चौथा धक्का बसला. विकेटकीपर ऋषभ पंतने अप्रतिम कौशल्य दाखवत कुलदीपच्या चेंडूवर जितेश शर्माला यष्टिचित केले. रिव्हर्स स्वीपचा प्रयत्न करताना जितेश क्रीझच्या बाहेर आला. चेंडू चुकला आणि पंतच्या ग्लोव्हजमध्ये गेला. एकही संधी वाया न घालवता पंतने चेंडू स्टंपवर मारला. जितेश नऊ धावा करून बाद झाला. १२ षटकांनंतर पंजाबची धावसंख्या चार गड्यांच्या मोबदल्यात १०३ धावा आहे.
मिचेल मार्श १५ वे षटकात सामना पंजाबकडे झुकला. सॅम करन आणि लियाम लिव्हिंगस्टोन या जोडीने १८ धावा केल्या. सॅम करनने आयपीएल कारकिर्दीतील चौथे अर्धशतक झळकावले. त्याने ३९ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्याची ६३ धावांची खेळी निर्णायक ठरली. १९ व्या षटकात पंजाबला सलग दोन धक्के बसले. अखेरच्या षटकातील दुसर्या चेंडूवर लियाम लिव्हिंगस्टोनने षटकार मारून सामना संपवला. त्याने २१ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने नाबाद ३८ धावांची खेळी केली.

# सीएसकेचा विजयीची तर आरसीबीची पराभवाची सलामी

## रॉयल चॅलेंजर्स बंगळूरवर ६ विकेटने मात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चेन्नई :** इंडियन प्रीमियर लीगच्या पहिल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरवर ६ विकेटनी धमाकेदार विजय मिळवला. आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद १७३ धावा केल्या, हे आव्हान चेन्नईने १८.४ षटकांत पूर्ण केले. सीएसकेकडून सामनावीर मुस्तफिजूर रहमानने २९ धावांत ४ विकेटस् घेत विजयाचा पाया घातला.
आरसीबीच्या आव्हानाचा पाठलाग करताना कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि रचिन रवींद्र यांनी सुरुवात जलद केली; परंतु त्यांची भागीदारी मोठे स्वरूप घेऊ शकली नाही. यश दयालने ऋतुराजला (१५) बाद करून ही जोडी फोडली. पहिलाच आयपीएल सामना खेळणारा रचिन रवींद्र ३७ धावांवर कर्ण शर्माची शिकार झाला. अजिंक्य रहाणेने १९चेंडूत २७ धावांची भर घातली. तर डॅरेल मिचेल (२२) धावा जोडून परतला. यावेळी चेन्नईला ६४ धावांची आवश्यकता होती.
रवींद्र जडेजा आणि शिवम दुबे या डावखुर्या जोडीने डावाची सूत्रे हाती घेतली. दोघांनी दहाच्या पुढे धावगती नेताना चेन्नईच्या फॅन्सची धकधक कमी केली. दोघांच्या फटकेबाजीमुळे सीएसकेने ८ चेंडू शिल्लक ठेवून सामना जिंकला. शिवम दुबेने अल्झारी जोसेफला षटकार आणि चौकार वसूल करून विजयी लक्ष्य गाठले. दुबे (३४) तर जडेजा (२५) धावांवर नाबाद राहिले.
तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना आरसीबीकडून कर्णधार फाफ डू प्लेसिसने स्फोटक खेळी केली. डू प्लेसिसने दीपक चहरवर हल्ला चढवत चौकार ठोकले. आरसीबीची गाडी सुसाट धावत असताना मुस्तफिजूर रहमानने या गाडीला ब्रेक लावला.



चेन्नई : सीएसकेच्या विजयात मोलाची कामगिरी बजावणारी शिवम दुबे व रवींद्र जडेजाची जोडी

डावाच्या ४१ धावांवर आरसीबीने कर्णधाराच्या रूपात आपला पहिला गडी गमावला. डू फ्लेसिसने ८ चौकारांसह ३५ धावा केल्या. त्यानंतर त्याच षटकात रजत पाटीदार एकही धाव न करता तंबूत परतला. पुढच्या षटकात दीपक चहरने ग्लेन मॅक्सवेल (०) आणि मुस्तफिजूरने कॅमेरून ग्रीनला (१८) आपल्या जाळ्यात फसवले. विराट कोहलीने संथ खेळी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या वाटेत अजिंक्य रहाणे आला. मुस्तफिजूरच्या गोलंदाजीवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात असलेल्या विराटचा रहाणेने अप्रतिम झेल घेतला. सीमारेषेच्या दिशेने चेंडू कूच करत असताना त्याने झेल टिपला अन् त्याच्या मदतीला रचिन रवींद्र धावला. दोघांनी मिळून झेल पूर्ण केला. विराट कोहली २० चेंडूंत २१ धावा करून बाद झाला. ५ बाद ७८ असा संघ अडचणीत असताना अनुज रावतने (४८) आणि दिनेश कार्तिकने नाबाद (३८) धावा कुटल्या. याच्या जोरावर आरसीबीने निर्धारित २० षटकांत ६ बाद १७३ धावा केल्या.
































